Historicity Research Journal                                    Impact Factor : 1.4152 (UIF)
ISSN : 2393-8900                                    Volume - 3 | Issue - 6 | February – 2017

# कैलाश लेणीतील - कलश

**डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव**
शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड , ता. कन्नड जि.औरंगाबाद.



**प्रस्तावनाः**

भारतीय संस्कृतीमध्ये कलश हे एक मंगल प्रतिक म्हणून मानले जाते. भारतीय कला व स्थापत्याच्या सौंदर्य निर्मीतीमध्ये कलशाचा वापर एक महत्वाचे प्रतिक म्हणून करण्यात आलेला आहे. मानवाने प्रारंभी निसर्गात होणाऱ्या चांगल्या वाईट नैसर्गिक घटनामुळे देवतेच्या कल्पनेस जन्म दिला. त्यानंतर नैसर्गिक देवतांची प्रतिकांच्या स्वरुपात पूजा केल्या जाऊ लागली व कालांतराने मानवाने प्रतिमांची निर्मीती करण्यास सुरुवात केली. मानवी , पशु-पक्षी, यांच्या बरोबरच मानवाने देवतांच्या प्रतिमांची निर्मीती करत असतांना मानवी प्रतिमांसारख्याच तयार केल्या परंतू या दैवी प्रतिमेत देवत्व दर्शवण्यासाठी कांही विशिष्ट बाबींचा अवलंब केला. देवतांची कल्पना व देवतामूर्ती ह्या मानव निर्मीत असल्याचे स्पष्ट होते. देवतांच्या प्रतिमांबरोबरच मानवासारखे देवतांच्या निवासासाठी देवालयांचे बांधकाम करण्यात आले.

मंदिर स्थापत्याच्या निर्मीती बरोबरच मंदिरांच्यामध्ये मूर्तिशिल्पांचा व प्रतिकांचाही समावेश होऊ लागला. विविध प्रतिकांपैकी कलश हे एक प्रतिक ज्याचा उपयोग विविध स्थापत्या बरोबरच भारतीयांच्या जीवनामध्ये मांगल्याचे प्रतिक म्हणून कलशाचा वापर पुजा विधीमध्ये होऊ लागला. केवळ हिंदू किंवा वैदिक धर्मातच नव्हे तर जैन व बौध्द धर्मातही कलश या प्रतिकाचे महत्व राहिलेले आहे. यामुळेच हिंदू, जैन व बौध्द कला-स्थापत्यामध्ये कलश या प्रतिकाची निर्मीती करण्यात आली आहे. कलश हे मांगल्याचे शुभ कार्याचे प्रतिक म्हणून वापरण्यात येत असले तरी या कलश निर्मीतीमागे निश्चितच कांहीतरी प्रयोजन असावे ज्यामुळे या प्रतिकाला भारतातील तिनही धर्मामध्ये अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे.

### कलश निर्मीतीचे प्रयोजन :

प्रागैतिहासिक काळापासूनच स्त्रिची शक्तीच्या स्वरुपात पूजा केली जात होती. मनवी जीवनामध्ये प्रजननाचे असलेले महत्व लक्षात घेऊन स्त्रियांना मातृदेवतेच्या स्वरुपात पूजले जाऊ लागले. यासंदर्भातील अनेक पुरावे भारतामध्ये उपलब्ध आहेत. येथील प्राचीन संस्कृती असलेली सिंधु संस्कृती ही मतृसत्ताक समाजव्यवस्था असलेली होती. या संस्कृतीच्या उत्खनना मध्ये बहुसंख्य स्त्री प्रतिमा व देवतेच्या स्वरुपात असलेल्या स्त्री मूर्ती आढळतात. मानवी जीवनामध्ये जलाचे महत्त्व असून, जल हे सृजनशिलता व सुफलनाशी संबंधीत ठरते. या अनुषंगानेच जलाचीही उपासना सिंधु संस्कृतीमध्ये केल्या जाऊ लागली. जलाची पूजा करण्याबरोबरच जलदेवता असलेल्या साती आसरांचींही पूजा केल्या जाऊ लागली. साती आसरांचेही मूर्तीशिल्प येथील उत्खननामध्ये सापडलेले आहे. त्यामुळेच जल व कलश यांचा संबंध राहिलेला आहे. डॉ. विलमोहिनी श्रीवास्तव यांच्य मते, ''हडप्पा व मोहेंजोदाडो येथे मातांच्या गर्भावस्थेतील मिळालेल्य मूर्ति ह्या गर्भिणी स्त्रिचे पोट आणि घट दोघांचेही समान गोलाकार घटाला गर्भिणी स्त्रीचे प्रतिक मानले गेले असावे. कांही अशाही मूर्ती उपलब्ध आहेत ज्या घटासारखे असून त्यावर स्त्रिचे शिर ठेवलेले आहेत.''[१] पृथ्वी व जल हे ज्याप्रमाणे नवसृजनतेचे व सुफलनाचे प्रतिक आहे. त्याप्रमाणे स्त्री गर्भ हे नवसृजनतेचे किंवा नवनिर्मीतीचे, सुफलनाचे प्रतिक आहे.

सिंधु संस्कृतीमध्ये स्त्रिचे मातृत्व सूचित करणारे अनेक मूर्ती आढळतात. गर्भवती स्त्री, मूल कडेवर असलेली स्त्री या बरोबरच ''हडप्पा येथे एका मातृ मूर्तिच्या योनितून निघणारे वृक्ष हे त्या स्त्रिचे मातृत्व स्पष्ट करणारे प्रतिक आहे.''[२] गर्भवती स्त्रिचे गर्भ यास कुंभाच्या म्हणजेच कलशाच्या रुपाने पुजले जाऊ लागले. मानवाने गर्भवती स्त्रीची कुंभाच्या संदर्भात केलेली कल्पना मानवी जन्माच्या संदर्भाने आहे परंतू मानवाच्या मृत्यूच्या संदर्भानेही कुंभाची कल्पना करण्यात आलेली आहे. विविध ठिकाणी झालेल्या उत्खननामध्ये विविध अवशेषांबरोबरच कुंभामध्ये मानवी प्रेते दफन केलेले आढळतात. कुंभाच्या रुपाने पुन्हा जन्माची त्यांची कल्पना असावी. ''सिंधुसंस्कृतीच्या अवशेषांमध्ये जे अस्थियुक्त कुंभ मिळाले आहेत, ते विशेषतः मयुरचिन्हांकीत आहेत... मृत जीवाला उदरी स्थान देणारा मयूर हा मातृदेवतेचा प्रतिनिधी आहे.''[३] थोडक्यात काय तर कुंभाच्या रुपाने त्यांनी पुनर्जन्माची केलेली कल्पना स्पष्ट होते. विशेष म्हणजे लहान मुलांच्या प्रेताचे दफन करत असताना मातेच्या गर्भामध्ये ज्या प्रमाणे त्याची ठेवण असते अगदी त्याच प्रमाणे कुंभामध्ये मुलांचे प्रेत दफन केलेली आढळतात.

सिंधुसंस्कृती नंतर वैदिक आर्यांच्या संस्कृतीच्या कालखंडास सुरुवात झाल्याचे बहुसंख्य विद्वानांनी मान्य केले आहे. वैदिक आर्यांनी रचलेल्या संस्कृत साहित्यातून कुंभाविषयीची माहिती मांडलेली आहे. सिंधुसंस्कृतीचा अभ्यास करत असताना केवळ पुरातत्त्वीय साधनांचा अनुमानावर निष्कर्ष मांडावा लागतो. कारण सिंधुवासीयांच्या लिपींचा उलगडा आजपर्यंततरी झालेला नाही. परंतु वैदिकांच्या वाङमयीन साधनांद्वारे लिखीत पुरावा उपलब्ध झाल्यामुळे त्यांचा जीवन विषयक दृष्टीकोण त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यातून स्पष्ट होतो.''पुर्णघट हा शब्द प्राचीन संस्कृत वाङमयात पूर्णकश, पूर्णकुंभ, मंगलकलश, मंगल घट, भद्रघट इत्यादी नामोल्लेखांनी ज्ञात आहे... ऋषींनी कालतत्त्वाच्या योनीतच एक ओसंडणारा पूर्णकुंभ विहित असतो आहे असे मानले आहे. अथर्ववेदात एका ठिकाणी... कुंभ धारण करणारी स्त्री आदरास प्राप्त होते असे म्हटले आहे.''[४] सिंधुजणांची मातृत्वासंदर्भात किंवा कुंभा संदर्भात असलेली कल्पना वैदिक आर्यांचीही असल्याचे स्पष्ट होते. एवढेच नाहीतर अनार्यांच्या किंवा द्रविडीयनांच्या संस्कृतीमध्ये पुजले जाणाऱ्या कुंभास वैदिक संस्कृतीत जास्तीचे महत्व प्राप्त झालेल्या वैदिक साहित्यातून स्पष्ट होते. कारण कलशा विषयी सविस्तर माहिती वैदिक साहित्यातून आलेली आहे. ''आर्यानी या लहानशा कलशांत सर्व देव, सप्त सागर, सप्त सरिता, सप्तद्वीपा धरित्री, चार वेद, गायत्री व सावित्री या सर्वांना आणून बसविले आहे.''[५] त्यामुळे कलशाचे महत्व वाढुन तो भारतीयांच्या जीवनातील मांगल्याचे प्रतिक बनला. प्रत्येक शुभ कार्याच्या वेळेस कलशाची पूजा केली जाते. कृषक संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून चालत आलेली ही परंपरा आजही भारतीय संस्कृतीमध्ये असल्याचे दिसते. नवरात्रामध्ये

आजही घट स्थापन करण्यात येतो, हा घट व धान सुफलनाचे प्रतिक म्हणुन पुजले जाते. थोडक्यात विविध धार्मिक पुजा व विधी कार्यक्रमामध्ये अध्यात्मिक व मांगल्याचे प्रतिक म्हणुन कलश पुजल्या जाण्यामागे सुफलन हेच असल्याचे स्पष्ट होते.

### कला-स्थापत्य व कलश :

कला-स्थापत्याच्या निर्मीतीबरोबरच कलश या प्रतिकाचा त्यामध्ये समावेश करण्यात आला. विशेष म्हणजे भारतात उदयास आलेल्या जैन, बौध्द व हिंदू या तीनही धर्मातील कला-स्थापत्यामध्ये याचा समावेश झालेला दिसतो. भारहुत, सांची, वाराणसी, नागार्जुनकोंडा इत्यादी ठिकाणी निर्माण झालेल्या स्थापत्यामध्ये कलशाची निर्मीती करण्यात आली. यामागे स्थापत्याच्या सौंदर्यवृध्दी बरोबरच अध्यात्मिक दृष्टीकोणही कारागिरांचा होता. विविध राजघराण्यांच्या काळात निर्माण करण्यात आलेले कलश स्थापत्यांच्या माध्यमातून पाहावयास मिळतात. महाराष्ट्रामध्ये सातवाहन, वाकाटक, चालुक्य व राष्ट्रकुट आणि यादव काळात मोठ्या प्रमाणात कला-स्थापत्याची निर्मीती करण्यात आली.

### वेरुळ येथील लेणी स्थापत्य व कैलाश लेणी :

औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यामध्ये औरंगाबाद पासून २८ की.मी. अंतरावर डोंगरामध्ये लेणीची निर्मीती करण्यात आलेली आहे. याठिकाणी एकुण ३४ लेणी असून प्राचीन भारतामध्ये असलेल्या बौध्द, हिंदू व जैन धर्माच्या संदर्भातील या लेणी आहेत. येथील लेणी नं.१ ते १२ हे बौध्द धर्मिय असून लेणी नं.१३ ते २९ ह्या हिंदू धर्मिय आहेत तर लेणी नं.३० ते ३४ ह्या जैन धर्मीय आहेत. याठिकाणी लेणी खोदण्याचे काम चालुक्यांच्या कारकिर्दीपासुन झालेले दिसते. चालुक्यांच्या नंतर आलेल्या राष्ट्रकुट राजघराण्यातील कृष्ण पहिला याच्या आज्ञेवरुन अखंड दगडामध्ये कैलाश मंदिराची निर्मीती करण्यात आली. माणकेश्वराचे मंदिर म्हणून ओळखले जाणारे हे लेणे भारतातील कला-स्थापत्याचा उत्कृष्ट अविष्कार आहे.

### कैलाश लेणीतील कलश :

कैलाश लेणीमध्ये प्रवेश करण्यासाठी दोन मजली गोपूर आहे या गोपूराच्या बाहेरुन वरच्या दर्शनीय भागावर एका रेषेत कलशांची निर्मीती करण्यात आली आहे. याच प्रमणे कैलाश मंदिराच्या बाजूला असलेल्या लंकेश्वर लेणीमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेल्या पायऱ्याच्या बाजुला असलेल्या भिंतीवर एका रेषेत कलशांची निर्मीती करण्यात आली आहे. शिवाय कैलाश मंदिराच्या मुख मंडपाच्या प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूने कुंभ हाती धारण केलेले स्त्री मूर्तिशिल्प आहे.

हे सर्व कलश सारखेच नाहीत भिंतीवर कोरलेले कलश हे एक सारखे आहेत पण ते स्तंभावर व स्त्री मूर्ति शिल्पामध्ये दाखवलेल्या कलशांसारखे नाहीत. स्तंभावर कोरलेले स्तंभ हे अधिक अलंकारपूर्ण असून स्तंभ सुशोभित करण्यावर भर दिलेला दिसतो. स्तंभावरील कोरावयाच्या कलशा संदर्भात शिल्पप्रकाश ग्रंथात अशा प्रकारची माहिती मिळते की, ‘‘नागांनी व कुंभांनी भुषवलेल्या स्तंभापैकी कुंभांनी भूषवलेले स्तंभ हे गौण समजले जातात. कुंभाच्या उंचीचे आडवे चार भाग करावेत. दोन भाग खांबाचा दण्ड असून (प्रत्येकी) एक भाग पाय (पाद) व मस्तक (शिर्ष) असते. कुंभाच्या जागेचे (उंचीत) असतो. खालच्या अर्ध्या भागात कंबर असून वरच्या भागात वेलबुट्टी असते.’’[६] या प्रमाणेच स्तंभावरील कलशांची निर्मीती करण्यात अली आहे. ठळक दिसणारे हे कलश व त्यावरील भागात फुलांच्या, वेलींच्यामुळे स्तंभ अधिकच सुंदर बनलेला आहे.

भिंतीवर कोरलेले कलश हे स्तंभावरील कलशाच्या तुलनेत साध्याच स्वरुपाचे आहेत. उभट गोलाकार व वरच्या छोट्याशा मुखातून निघणारी पाने दाखवलेले आहेत. या प्रमाणेच स्त्री मूर्तिशिल्पाच्या हाती दाखवलेले कलश हे आकाराने छोटे व गोलाकारात असून त्याच्या वरील बाजूसही कलशामध्ये ठेवलेली पाने दाखवलेले आहेत.

### सारांश :

कैलाश लेणीमध्ये भिंतीवर, कोरण्यात आलेले कलश हे मांगल्याचे प्रतिक म्हणुन कोरलेले आहेत. स्तंभाच्या सुशोभिकरणासाठी अप्रतिम अशा प्रकारची कलाकुसर कलश या प्रतिकाच्या रुपाने केलेली पाहावयास मिळते. कैलाशमध्ये कलश निर्मीतीमागचे प्रयोजन हे भौतिक व अध्यात्मिक असे दोन्ही दृष्टीकोण कारागिरांचे असावेत. सृजनशिलतेचे किंवा सुफलनाचे प्रतिक म्हणुनच कारागिरांनी याची निर्मीती केलेली दिसते. लेणीच्या मुख्य ठिकाणी प्रवेशद्वारावर किंवा स्तंभावर सहज दिसतील अशा प्रकारचे भरीव कुंभ व त्यावरील पाने व फुले आणि नक्षी कोरण्यामागे कुंभाच्या माध्यमातुन नवनिर्मीती दाखवण्याचा विविध धार्मिक ग्रंथाचा उद्देश व या ग्रंथांच्या प्रभावातुन कारागिरांचा दृष्टीकोण अशा प्रकारचा बनला असावा व त्यातुनच अशा प्रकारच्या कलशाची निर्मीती झालेली दिसते.

### संदर्भ :-


१. डॉ. श्रीवास्तव विमलमोहिनी- प्राचीन भारतीय कला में मांगलिक प्रतिक- विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी- २००२ पृ.३९
२. डॉ. शर्मा श्याम-प्राचीन भारतीय कला, वास्तुकला एवं मूर्तिकला- जयपूर- २०१२ पृ.३०
३. ढेरे रा.चिं.- लज्जागौरी- पुणे- २०१५ पृ.१२७
४. देशपांडे सु.र. - भारतीय कामशिल्प- कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे-१९८६ पृ.४३
५. पं. जोशी महादेवशास्त्री- संस्कृतीची प्रतिके- ज्ञानराज प्रकाशन, पुणे-१९६२ पृ.२१
६. डॉ.कुलकर्णी र.पु. - शिल्पप्रकाश- महाराष्ट्र राज्य साहित्यसंस्कृती मंडळ, मुंबई- जानेवारी २००० पृ.२४-२५.





